# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

लेखा व वित्त विभाग

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in E-mail – account@pcmcindia.gov.in


जा.क्र.लेखा/२९/कावि/१४१/२०२४

दिनांक :- २ /०८/२०२४

## परिपत्रक

विषय : अंदाजपत्रकातील तरतूदींसंदर्भातील वाढ-घट प्रस्तावांबाबत.

संदर्भ:- १) मा.आयुक्त सो यांचे कडील परिपत्रक क्र.लेखा/२९/कावि/७६/२२ दि.२३/०५/२०२२

२) मा.आयुक्त सो यांचे कडील परिपत्रक क्र.लेखा/२९/कावि/११८/२३ दि.१९/०५/२०२३

३) लेखा विभागाकडील परिपत्रक क्र.लेखा/२९/कावि/७४/२४ दि.२२/०५/२०२४

मा.आयुक्त सो यांचेकडील संदर्भिय परिपत्रकान्वये सर्व विभागांना अंदाजपत्रकामध्ये नविन विकास कामांचा अथवा लेखाशिर्षांचा समावेश करणे, अंदाजपत्रकीय तरतूदींमध्ये वाढ-घट करणे, अथवा अंदाजपत्रकामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे मार्फत मा.आयुक्त सो, यांचे मान्यतेने मा.स्थायी समिती व मा.महापालिका सभेपुढे प्रस्ताव सादर करणेकामी संदर्भिय परिपत्रकांनुसार वेळोवेळी सुचीत करणेत आलेले आहे. परंतु अद्यापही काही विभागांकडून अंदाजपत्रकीय तरतूद वाढ-घट प्रस्ताव मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक ( वित्त) यांचेकडे अभिप्रायाकामी सादर न करता थेट मा.आयुक्त सो यांची मान्यता घेऊन लेखा विभागाकडे अंदाजपत्रकीय तरतूद वाढ-घट प्रस्ताव/आदेश अंमलबजावणी करणेकामी पाठविल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बाब ही आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने योग्य नाही. सदर प्रस्ताव व मंजुर ठरावांची लेखा विभागामार्फत तपासणी केली असता त्यामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत उदा. अंदाजपत्रक पानांक व अनुक्रमांक चुकणे, घट करणेकामी प्रस्तावित केलेल्या तरतूदींमध्ये तरतूद शिल्लक नसणे अथवा ज्या विभागामधुन तरतूद घट केलेली आहे त्या विभागप्रमुखांची तरतूद घट करणेकामी परवानगी न घेणे, अत्यावश्यक बाबींच्या लेखाशिर्षांमधून तरतूद घट करणे, कामाची नावे चुकणे, स्थायी समिती ठराव क्रमांक चुकणे, इत्यादी. अशा प्रस्ताव व आदेशातील असलेल्या त्रुटींमुळे सदर प्रस्ताव / आदेशाची अंमलबजावणी करता येऊ शकत नाही. मनपा अंदाजपत्रकामध्ये कोणत्याही विभागप्रमुखांस कोणताही बदल / अंदाजपत्रकीय तरतूदींमध्ये वाढ-घट करावयाची असल्यास आर्थिक बाबीशी निगडीत असल्याने मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक ( वित्त) यांचा अभिप्राय घेणे अत्यंत आवश्यक आहे.

सबब, सर्व विभागप्रमुखांना सुचीत करणेत येते की, अंदाजपत्रकामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास विभागप्रमुखांनी प्रस्ताव मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक ( वित्त) यांचे अभिप्रायाकामी सादर करावेत. लेखा विभागामार्फत सदर प्रस्तावाची तपासणी करून योग्य असल्यास मा.आयुक्त सो यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेत येतील. मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) यांचे अभिप्रायाशिवाय विभागांनी परस्पर अंदाजपत्रकीय तरतूदी संदर्भातील प्रस्ताव मा.आयुक्त सो यांचे मान्यतेकामी सादर करू नयेत. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक ( वित्त) यांचे अभिप्रायाशिवाय सादर केलेल्या प्रस्तावांची अंमलबजावणी केली जाणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

( शेखर सिंह )

**आयुक्त तथा प्रशासक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी

प्रति:- सर्व संबंधीत विभाग/ विभागप्रमुख